**<u>निशाणी क्रं.१ वरील आदेश</u>**

सदरचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४८३ प्रमाणे अर्जदार दत्तात्रय बाळासाहेब कापरे, यांनी शिक्रापुर पोलीस स्टेशनमध्ये दाखल गुन्हा रजिस्टर नं. १२६/२०२६, भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३), सह कलम ३(५) प्रमाणेच्या अपराधांसाठीच्या असलेल्या गुन्ह्यात नियमित जामीन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२) अर्जदाराचे कथन असे आहे की, त्याच्या विरुध्दचे आरोप खोटेपणाने जमिनीच्या वादावरुन करण्यात आलेले आहे व त्याला खोटेपणाने गोवले आहे व घटना जमिनीच्या वादातून घडलेली आहे. घटनेपुर्वी अर्जदाराने फिर्यादीविरुध्द दि. २७.१२.२०२५ रोजी अदखलपात्र गुन्ह्याची फिर्याद दिली होती. फिर्यादी हॉस्पीटलमधुन डिस्चार्ज झालेला आहे.

३) फिर्यादी पक्षाने खुलासा दाखल करुन जामीन अर्जास खालील कारणांस्तव विरोध केला आहे -

१. सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे.
२. अर्जदार पुन्हा गुन्हा करण्याची शक्यता आहे.
३. हत्यार जप्त करणे आहे, फिर्यादी व साक्षीदारांना धमकावण्याची शक्यता आहे.

४) दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रं पाहिले.

५) तपासाची कागदपत्रे पाहता असे दिसते की, फिर्यादी याने दवाखान्यात दाखल असतांना फिर्याद दाखल केली. दि. १३.०२.२०२६ रोजी फिर्यादी नदीकडे मोटार बंद करण्यासाठी जात असतांना अर्जदार त्याच्या पाठीमागे आला व कुठलाही विचार न करता फिर्यादीला अंगावर जाऊन शिवीगाळ व धमकी देऊन हातात कोयता घेऊन फिर्यादीच्या पाठीमागे लागला. फिर्यादी त्याचे वाहन घेऊन जात असतांना अर्जदाराने त्याची पत्नी व मुलगा यांना बोलावले व त्यानंतर

अर्जदाराच्या मुलाने फिर्यादीच्या गाडीसमोर त्याची गाडी आडवी लावली व त्यावेळी अर्जदाराने कोयत्याने फिर्यादीच्या डोक्यावर वार केला. फिर्यादीने हॉस्पीटलमध्ये उपचार घेतले. फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र पाहता त्याला गंभीर स्वरुपाची जखम झाल्याची दिसते.

६) वर नमुद घटना व दोन्ही बाजुंचा युक्तीवाद पाहता सदर अर्जदाराच्या बाबतीत तपास ब-याच अंशी पुर्ण झालेला दिसतो. फिर्यादी अद्यापही दवाखान्यात उपचार घेत आहे, असे फिर्यादीपक्षाचे कथन नाही. अर्जदाराला यापुढे कोठडीत ठेवण्याची आवश्यकता दिसून येत नाही. अर्जदाराविरुध्द गुन्ह्यांची चौकशी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्यासमोर चालणार आहे. त्यामुळे अर्जदारास काही अटींवर जामीन मंजुर करण्यात येतो. सबब, पुढील आदेश करण्यात येतो -

**<u>आदेश</u>**

१) अर्जदार नामे दत्तात्रय बाळासाहेब कापरे यास शिक्रापुर पोलीस स्टेशनमध्ये दाखल गुन्हा रजिस्टर नं. १२६/२०२६, भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३), सह कलम ३(५) प्रमाणेच्या अपराधांसाठीच्या असलेल्या गुन्ह्यात वैयक्तीक जात मुचलका रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार फक्त) व तेवढ्याच रक्कमेचा लायक जामीनदार देण्याचे अटींवर व पुढील अटींवर जामीन मंजुर करण्यात येतो.

अ) अर्जदार यांनी शिक्रापुर पोलीस स्टेशनमध्ये प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला सकाळी ११.०० ते दुपारी ०१.०० या दरम्यान तपास पुर्ण होईपर्यंत व तपास पुर्ण झाल्यानंतर दोषारोपपत्र दाखल झाल्यास खटल्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत हजर रहावे.

ब) अर्जदार यांनी साक्षीदारांवर दबाव आणु नये.

क) वरील अटींचा भंग केल्यास सदर जामीन रद्द होण्यास पात्र राहिल.

२) जामीन संबंधीत न्यायालयात सादर करावा व त्यावेळी स्वतःचा रहिवासी पत्ता व फोन नंबर सादर करावा.

३) संबंधीत पोलीस स्टेशनला कळवावे.

POL SURESH PRABHAKAR
Digitally signed by POL SURESH PRABHAKAR
Date: 2026.03.13 17:07:19 +0530

घोडनदी-शिरुर
दि. १३/०३/२०२६

(एस. पी. पोळ)
अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश,
घोडनदी-शिरुर, जि. पुणे.